# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नागपुर शहर **P.S.(ठाणे):** पाचपावली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0347 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/05/2026 03:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 25/05/2026
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/05/2026
   **Time From (वेळेपासून):** 12:36 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 22:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/05/2026 **Time (वेळ):** 15:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/05/2026 03:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कार्यालय राज्य विमा कामगार, ,सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर , मधील आलोसे श्री हर्षल कसबे,यांचे कक्ष पो ठाणे पाचपावली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** जितेंद्र नामदेवराव वैरागडे पोलीस निरीक्षक

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपुर,सदर,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपुर,सदर,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9420178674

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हर्षल अरुण कसबे | | | 1. सि/ओ नरेंद्र पांडे,,प्लाट क्र 19, ,वैशाली नगर नागपूर, पाचपावली,नागपुर शहर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि | गणकयंत्र/कॅलक्युलेटर | एक कल्क्युलेटर | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | इलेक्ट्रॉनिक सामान | | | |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | रिअल मी नारझो कंपीनचा मोबाईल | 0.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | आलोसे याने तक्रारदार याचेकडुन स्विकारलेली लाच रक्कम | 2,000.00 |
| 4 | इतर | घरगुती वस्तु | तक्रारदार यांचे वैद्यकीय प्रतिपुर्ती बिलाबाबतची कागदपत्रे | 0.00 |
| 5 | इतर | संकीर्ण/विविध | लाचरक्कम ठेवलेलला आलोसे यांचा फुलपन्ट | 0.00 |
| 6 | इतर | संकीर्ण/विविध | तिन मेमोरीकार्ड, | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पो.ठाणे पाचपावली, नागपूर शहर

दिनांक 25/05/2026

माझे नाव जितेंद्र नामदेवराव वैरागडे, वय 40 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर, मोनं 9420178674

समक्ष पोलीस ठाणे पाचपावली, नागपूर शहर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की, मी मागील दिड वर्षापासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपुर येथे कार्यरत आहे.

मी दि. 18/05/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय प्रशासकिय ईमारत क्र. 1, चौथा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे हजर असतांना श्री. राजीव कर्मलवार, वाचक पोलीस निरीक्षक यांनी आम्हाला बोलाविले. त्यावरून आम्ही पोलीस अधीक्षक कार्यालय, ला.प्र.वि. नागपूर येथे येवून वाचक पोलीस निरीक्षक श्री. राजीव कर्मलवार यांना भेटलो असता त्यांचे कक्षात एक महिला व एक पुरुष असे बसुन होते. श्री. राजीव कर्मलवार यांनी त्यांचे कक्षात हजर असलेल्या व्यक्तीस आमचा परिचय करून दिला व त्या व्यक्तींचा परिचय आम्हास श्रीमती शुभला गौरव जनबंधु व त्यांचेसोबत त्यांचे पती श्री. गौरव जनबंधु असा करून दिला. श्री. राजीव कर्मलवार, वाचक पोलीस निरीक्षक यांनी आम्हास सांगितले की, श्रीमती शुभला गौरव जनबंधु यांची एका लोकसेवकाविरूध्द लाचेच्या मागणी संबंधाने तक्रार आहे. त्यांना तुमचे कक्षामध्ये घेवून जावून योग्य ती कायदेषीर कार्यवाही करा असे मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांनी आदेशित केले आहे. श्रीमती शुभला गौरव जनबंधु वय 29 वर्षे यांना आम्ही आमचे कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रशासकिय इमारत क्र. 1, 4 था माळा सिव्हील लाईन नागपूर येथे तक्रारदार श्रीमती शुभला गौरव जनबंधु वय 29 वर्षे व त्यांचे पती श्री. गौरव जनबंधु यांना घेवुन आलो व तक्रारदार यांनी आम्हास एका लोकसेवकांविरूध्द तक्रार असल्याचे सांगुन त्यांनी त्यांची हस्तलिखीत तक्रार सादर केली व ती आम्ही टंकलिखीत करुन घेतली सदर हस्तलिखीत व टंकलिखीत तक्रारीवर त्यांनी सही केली व आम्ही समक्ष म्हणून सही केली.

त्यानंतर लाचरक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी 2 शासकीय पंचाची आवश्यकता असल्याने आम्ही मा. नगर भुमापन अधिकारी क्रमांक 3 कार्यालय प्रशासकिय इमारत क्र. 2 पाचवा माळा सिव्हिल लाईन्स, नागपूर यांना पत्र देऊन वर्ग- 3 चे दोन शासकीय कर्मचारी ज्यामध्ये एक महिला असे पंच

म्हणून काम करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबतचे पत्र पोषी. प्रफुल भातुलकर यांचे हस्ते सादर केले. त्यानुसार त्यांचे कार्यालयातील वर्ग-3 चे 1) श्रीमती श्रुतिका प्रेमदास ठवरे, वय-47, पद- भु-करमापक (टंकलेखक), कार्यालय- नगर भुमापन अधिकारी क्रमांक 3, प्रशासकिय इमारत क्र. 1 सहावा माळा सिव्हील लाईन नागपूर रा. प्लॉट नं. 2 न्यु प्रेरणा नगर बुध्द विहार जवळ न्यु नरसाळा रोड नागपूर-34, 2) श्री महेश खुशालराव खोब्रागडे, वय-37, पद- भु-करमापक, कार्यालय- भुमापन अधिकारी क्रमांक 2 प्रशासकिय इमारत क्र. 1 पाचवा माळा सिव्हील लाईन नागपूर रा. बिल्डींग नं. 5, क्वार्टर नं. 71 अंबाझरी पोलीस स्टेशन जवळ रविनगर वसाहत नागपूर यांना आमचे कार्यालयात पोशी. प्रफुल भातुलकर यांचेसह पाठविले. त्यांचे संमतीपत्र लिहुन घेण्यात आले. तक्रारदाराची तक्रार खालीलप्रमाणे आहे.

माझे नावः-श्रीमती शुभला गौरव जनबंधु वय 29 वर्षे, व्यवसाय-खाजगी नोकरी रा. प्ला ॅट नं.बी/11/125, एकता कॉलनी, यादवनगर, कामठी रोड नागपूर- 440026 मो.क्र. 7020335033

मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रशासकिय इमारत क्र.01,नागपूर,कार्यालयात हजर येऊन तक्रार देते की, मी वर नमूद पत्यावर माझे पती श्री. गौरव जनबंधु व बाळासह वास्तव्यास असून, मी ASHPA GLOBAL LMT. येथे कर्मचारी म्हणून सन 2018 पासून काम करते. मी सदर ठिकाणी काम करीत असल्यामुळे मला कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) अंतर्गत वैघकिय सुविधा, आजारपण भत्ता, अपघात भरपाई, मातृत्व लाभ इ. सुविधांचा लाभ देय असून माझा ESIC विमा क्र. 2304142424 असा आहे.

नोव्हेंबर 2025 मध्ये तिरपूडे मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल, कामठी रोड, नागपूर येथे माझी डिलीव्हरी झाली असून नमुद रूग्णालयात मला रूग्णालयीन खर्च व औषधावरील खर्च असा मिळून 39250/- रूपये खर्च आला असून नमूद बिल मी भरलेले आहे. नमूद वैघकिय बिलाच्या परिपूर्ती करीता मी माझे पतिसह कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) चे शाखा कार्यालय, सदर नागपूर येथे गेलो असता तेथे काम करणारे कर्मचारी यांनी EMPLOYEE DETAIL वर स्वाक्षरी करून कागदपत्रे माझेकडे दिले व त्यांनी मला कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) चे पाचपावली षाखा,नागपूर येथे जाण्यास सांगीतले.

दि.17/12/2025 रोजी मी माझे पतिसह राज्य विमा कामगार, सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर येथे जावून प्रभारी विमा वैद्यकिय अधिकारी यांचे नावाने वैद्यकिय प्रतिपूर्ती बिलाचे मंजुरी करीता संपूर्ण कागदपत्रासह अर्ज केला. त्यानंतर आमचे बिलाच्या प्रतिपुर्ती करीता तेथील वैद्यकीय बिलाचे कामकाज पाहणारे लिपीक श्री. हर्षल कसबे यांना भेटुन बिलाबाबत विचारणा केली परंतु वैद्यकीय बिलाची प्रतिपुर्ती झालेली नाही. त्यानंतर दि.13/05/2026 रोजी माझे पतिसह राज्य विमा कामगार, सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर येथे माझे पतीसह जावुन लिपीक श्री. हर्षल कसबे यांना भेटलो असता त्यांनी माझे प्रसुतीचे वैद्यकिय बिल पास करण्याकरीता माझे वैद्यकिय बिलाचे एकूण रकमेच्या म्हणजेच 39,250/- रू.च्या आठ टक्के एवढया लाच रकमेची मागणी केली त्यावेळी आम्ही ठिक आहे म्हणुन तेथुन परत आलेलो हातो. त्यानंतर दि. 14/05/2026 रोजी याच बिलासंबंधी माझे पती लिपीक श्री. हर्षल कसबे यांना भेटण्याकरीता गेलेले होते तेव्हा त्यांना सुध्दा लिपीक श्री. हर्षल कसबे यांनी एकुण बिलाच्या आठ टक्के रक्कमेची लाचमागणी केली व लाचरक्कम दिल्यानंतर लवकरच तुमचे बिल पास होईल असे सांगीतले. लिपीक श्री. हर्शल कसबे यांनी केलेल्या लाचमागणीबाबत त्याच दिवशी मला माझे पती श्री. गौरव जनबंधु यांनी मला सांगीतले. तरी माझी गैरअर्जदार लिपीक श्री. हर्षल कसबे, राज्य विमा कामगार, सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांचेविरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रषासकिय इमारत क्र.01, 4 था माळा,नागपूर कार्यालय नागपूर येथे तक्रार देत आहे. गैरअर्जदार यांच्याशी माझे कुठलेही वैमनस्य नाही व कुठल्याही प्रकारचे आर्थीक देवाण घेवाणीचे संबंध नाही.

मला गैरअर्जदार लिपीक श्री. हर्षल कसबे, राज्य विमा कामगार, सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर यांनी मागीतलेली लाच रक्कम एकूण बिल रकम 39,250/-रू. चे आठ टक्के म्हणजेच 3,140/- रुपये मोठामोठी 3000/- रुपये होते. त्यापैकी मी 2,000/- रुपये माझे बचती मधून आपणाकडे हजर करीत आहे. तसेच मी माझे प्रसुती वैद्यकीय बिलासंबंधीचे कागदपत्राचांच्या झेरा ॅक्स प्रती मी आपणाकडे हजर करीत आहे.

करीता गैरअर्जदार लिपीक श्री. हर्शल कसबे, राज्य विमा कामगार, सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर यांच्या विरुध्द कायदेषिर कार्यवाही होण्याकरीता मी मराठी भाषेत स्वहस्ताक्षरात लेखी रिपोर्ट देत आहे.

अशी तक्रार पंचानी वाचुन टंकलिखित तक्रारीबाबत तक्रारदार यांचेशी तोंडी विचारपुस करून ती बरोबर असल्याची खात्री केल्यावर त्यावर दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या व त्यानंतर सदरची तक्रार आम्ही संगणकावर टंकलीखीत करून त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या.

त्यानंतर तक्रारदार श्रीमती शुभला गौरव जनबंधु यांनी गैरअर्जदार यांना लाचे मध्ये देण्याकरिता 500/- रू

दराच्या 4 चलनी नोटा एकुण 2,000/- अषी आपल्या वैयक्तिक बचतीतील हजर केले. तसेच त्यांच्या प्रसुती वैद्यकीय देयकाच्या आमचेकडे हजर केलेल्या झेराक्स प्रती सादर केल्यात.

यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना लाचेच्या सापळा प्रकरणात उपयोग करण्यात येणाऱ्या अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहीती देवून अँथ्रासिन पावडरचा संपर्क आलेल्या भागावर अल्ट्राव्हॅायलेट दिव्याचे प्रकाशात पाहिल्यास पावडरला हिरवट रंगाची चकाकी दिसुन येते असे सांगीतले व त्याबाबत पो.हवा. विलीन तांबडे यांचे हस्ते प्रात्यक्षिक दाखविण्यात आले बाबत सविस्तर नोंद प्रात्यक्षिक पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आली आहे.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्यांना आमचेकडील कार्यालयात उपलब्ध असलेल्या डिजीटल व्हाईस रेकार्डर बाबत माहिती दिली व त्याचे काम करण्याची पध्दतीबाबत पो.अं. प्रफुल भातुलकर यांचे मार्फतीने माहिति देण्यात आली आहे सविस्तर नोंद प्रात्यक्षिक पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळ 13.00 वा आम्ही, ट्रॅपचे आवश्यक साहित्यासह पंच क्र. 2 तसेच सापळा पार्टीतील सदस्य आम्ही, पो.शि. होमेश्वर वाईलकर, म.पो.हवा. गिता चौधरी पंच क्र. 1 व 2 तसेच खाजगी वाहन क्र. 1 ने तसेच खाजगी वाहन क्र. 2 ने पो.उप.अधी. श्री. अनिल जिट्टावार, पो.हवा. आशिष वैद्य, गिता चौधरी व पो.शि. प्रफुल भातुलकर असे आमचे खाजगी वाहन क्र. 2 ने हनुमान मंदिर, दयानंद ग्राऊंड, वैशाली नगर, नागपूर कडे जाण्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, प्रशासकिय इमारत क्र. 1 चौथा माळा सिव्हिल लाईन नागपूर झिरो माईल नागपूर येथुन रवाना झालो वेळ अंदाजे 13.00 वा. पोहोचलो. त्यानंतर लिपीक श्री. हर्षल कसबे, राज्य विमा कामगार, सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर यांची लाचेची मागणी पडताळणी करणे असल्याने, तक्रारदार यांची महिला पंच व महिला स्टाफ यांच्या हस्ते अंगझडती घेण्यात आली. तक्रारदार, पंच व स्टाफ यांना सापळा पडताळणी बाबत आवश्यक सुचना देण्यात आल्या. त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी SanDisk 32 GB Micro SDHC Card Serial No. 4327XV1321TV BM वर्णनाचे व्हाॅईस रेकॉर्डरमध्ये मेमोरीकार्ड टाकुण वेळ 14.06 वा. सुरु करुन पंच क्र. 1 यांच्या आवाजात सुरु करुत तक्रारदार यांच्या गळ्यामध्ये दिसणार नाही अषा स्थितीमध्ये लटकविण्यात आले व तक्रारदार व पंच क्र. 1 यांना तक्रारदाराच्या मोपेड वाहनाने लाच पडताळणीकरीता गै.अ. यांच्या कार्यालयात पाठविण्यात आले. काही वेळानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 या आम्ही हजर असलेल्या ठिकाणी परत आल्या पडताळणीवरून परत आल्याबाबत पंच क्र. 1 यांचा आवाज रेकॉर्ड करून पो. षि. प्रफुल भातुलकर यांनी वेळ सुमारे 14.34 वाजता रेकॉर्डर बंद केला. तक्रारदार यांची अंगझडती घेण्यात आली.त्यानंतर आम्ही, पंच क्र. 1 श्रीमती श्रुतीका ठवरे यांना तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात लाच रकमेबाबत झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 श्रीमती श्रुतिका ठवरे यांनी सांगितले की, मी तक्रारदारासोबत त्यांच्या मोपेड वाहनाने गै.अ. यांचे कार्यालयामध्ये भेटण्यास गेले होते. गैरअर्जदार यांचे कार्यालयासमोर आम्ही आमचे वाहन ठेवुन गैरअर्जदार यांना भटण्याकरीता त्यांचे कार्यालयात जात असताना गैरअर्जदार यांनी मला बाहेर थांबण्यास सांगीतले म्हणुन मी त्यांचे कार्यालयाजवळच थांबुन तक्रारदार व गैरअर्जदार याचे संभाशणावर लक्ष देवुन होते. तक्रारदार ही गैरअर्जदार यांचे कॅबीनमध्ये गेली व त्यांचे समोरील खुर्चीवर बसुन तक्रारदार हीने आधी गैरअर्जदारासोबत तिचे कामासंबंधी बोलली तेव्हा गैरअर्जदार यांनी तक्रारदारास वैद्यकीय देयकाचे कागदपत्रांबाबत विचारपूस केली दरम्यान गैरअर्जदार यांनी लाचेलाच उद्देषुन आणले का अषी विचारणा केली त्यावर तक्रारदार हीने सद्या तर तेवढी कॅष नाही आहे तसेच तक्रारदार यांचे एकोणचाळीस हजार बिलावरील आठ परसेंट ही खुप जास्त रक्कम होते त्यामुळे काही कमी करा अषी विनंती केली त्यावर गैरर्जदार यांनी अच्छा ठिक आहे असे बोलले. तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांना फायनल अमाउंट बाबत विचारणा केली असता गैरअर्जदार यांनी कार्यालयातील टेबलवरील एक कॅल्क्युलेटर वर काहीतरी टाईप करुन तक्रारदारास दाखवले व म्हणाले की, तसे तर एवढे होतात परंतु तुम्हाला आम्ही आठ टक्केच म्हणत आहो. त्यावर तक्रारदार यांनी कॅल्क्युलेटरकडे पाहुन अच्छा 10 परसेंट असे म्हणाली. संभाषणा दरम्यानच गैरअर्जदार कागदपत्रांचे दोन सेट आणले का असे तक्रारदार यांना विचारले व त्यानंतर आता तुम्ही किती करणार आहेत असे लाचरक्कमेबाबत विचारणा केली त्यावर तक्रारदार यांनी सद्या माझ्याकडे कॅश नाही आहे मी माझ्या मम्मीला बोलुन अँड्जेस्ट करते व अध्र्या-एक तासात येवुन तुम्हाला परत भेटते असे सांगीतले यावर गैरअर्जदार यांनी ठिक आहे म्हटले संभाशण पुर्ण झाल्यानंतर मी व तक्रारदार या ठिकाणी परत आलो व माझे आवाजात व्हाईस रेकाॅर्डर बंद करण्यात आला असे कथन केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. त्यावर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार यांना विचारले की, गैरअर्जदार यांनी आपणाला कॅल्क्युलेटर वर काय टाईप करुन दाखविले. यावर तक्रारदार म्हणाली की, मी गैरअर्जदार यांचेशी माझे कामाबाबत बोलली त्यानंतर गैरअर्जदार यांनी मला कागदपत्रांबाबत विचारपुस केली संभाशणा दरम्यान मी त्यांना आठ परसेंट जास्त होते सर असे म्हटले असता त्यांनी कॅल्क्युलेटर वर 10 टाईप

करुन दाखवत आम्ही इतरांकडुन एवढे घेतो आपणाकडुन तर एवढेच म्हणजेच 8 टक्केच घेतो असे म्हणाले. मेमोरी कार्ड क्र. SanDisk 32 GB Micro SDHC Card Serial No. 4327XV1321TV BM रेकार्ॅड झालेली फाईल 260518_1406 ऐकुण स्क्रिप्ट तयार करण्यात आली. हॅशव्हॅल्यु घेण्यात आली असता B1D91C364104667ECE831D5217830A78 अशी निर्माण झाली आहे.

गैरअर्जदाराची लाचेची पडताळणी झाल्यानंतर सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तक्रारदार यांची सापळा पुर्व अंगझडती घेण्यात आली. तक्रारदार, पंच व स्टाफ यांना सापळा पुर्वीच्या आवश्यक सुचना देण्यात आल्या. आमच्या सुचनेवरुन पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी वरील मेमोरीकार्ड व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये टाकुन त्यात 260518_1406 व्यतीरीक्त इतर डाटा नसल्याची पंचाची खात्री करुन दिली व वेळ 15.20 वा पंच क्र. 1 यांचे आवाजात सुरु करुन तक्रारदार यांचे गळ्यामध्ये कोणालाही दिसणार नाही असता लटकवुन पंच क्र. 1 सह गैरअर्जदार यांचे कार्यालयात पाठविण्यात आले व आम्ही पंच क्र. 2 व स्टाफसह आमचेकडील उपलब्ध वाहनाने रवाना झालो व गै.अ. यांचे कार्यालयाचे आजुबाजुलाच थांबुन राहीलो काही वेळानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 या त्यांचे जवळील मोपेड वाहनाने परत हनुमान मंदिर दयानंद ग्राउंड वैशाली नगर नागपूर येथे निघाले व त्यांचे मागोमाग आम्ही सुध्दा पोहोचलो. आमच्या सुचनेवरुन पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन व्हाईस रेकाॅर्डर वेळ 16/05 वाजता पंच क्र. 1 यांचा आवाजात बंद करण्यात आले. तक्रारदाराची झडती घेण्यात आली. यानंतर आम्ही, पंच क्र. 1 श्रीमती श्रुतीका ठवरे यांना तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात लाच रकमेबाबत झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 श्रीमती श्रुतिका ठवरे यांनी सांगितले की, मी तक्रारदारासोबत त्यांच्या मोपेड वाहनाने गै.अ. यांचे कार्यालयामध्ये भेटण्यास गेले होते. गैरअर्जदार यांचे कार्यालयासमोर आम्ही आमचे वाहन ठेवुन गैरअर्जदार यांना भेटण्याकरीता त्यांचे कार्यालयात जात असताना गैरअर्जदार यांनी आम्हा दोघींनाही पाच मिनीट थांबा असे म्हणाले म्हणुन आम्ही दोघीही गैरअर्जदार यांचे कार्यायलाचे बाहेर थांबुन राहीलो. काही वेळाने गैरअर्जदार यांनी आम्हाला त्यांचे कार्यालयाचे आत बोलाविले मला बाहेरच थांबण्याचा हाताने इशारा केला. मी कार्यालयाचे बाहेरच थांबुन तक्रारदार व गैरअर्जदार यांचे संभाशण बारकाईने ऐकत होते. तक्रारदार ही गैरअर्जदार यांचे ऑफीसमध्ये गेली व त्यांचे समोरील खुर्चीवर बसुन तक्रारदार हीने आधी गैरअर्जदारासोबत तिचे कामासंबंधी बोलली संभाशणादरम्यान गैरअर्जदार यांनी ते करणार आहे का नाही असे म्हणुन लाच रकमेबाबत विचारणा केली त्यावर तक्रारदार म्हणाली की, सद्या माझ्याकडे 2000 रुपये आहे बाकीचे नंतर दिले तर चालणार का? यावर गैरअर्जदार चालते... असे बोलले. त्यानंतर गैरअर्जदार म्हणाले की, सद्या (लाच रक्कमेला उद्देषुन) हे राहु द्या व चार पाच दिवसांनी मी तुम्हाला फोन करतो तेव्हा द्या असे बोलुन तक्रारदार यांना गैरअर्जदार यांनी मोबाईल क्रमांक मागीतला. तक्रारदार यांनी एका चिठ्ठीवर मोबाईल क्रमांक लिहुन दिला. तक्रारदार यांचेकडील कामाचे कागदपत्रे गैरअर्जदाराने स्वतःकडे ठेवुन घेतले. त्यावर तक्रारदाराने कागदपत्रांची रिसीव्ह काॅपी मिळणार नाही का? अशी विचारणा केली असता गैरअर्जदार यांनी रिसीफ्ट वेगैरे काही नाही आहे असे व इतर संभाषण पुर्ण झाल्यानंतर गैरअर्जदाराने लाचरक्कम न स्विकारल्याने मी व तक्रारदार या ठिकाणी परत आलो व माझे आवाजात व्हाईस रेकाॅर्डर बंद करण्यात आला असे कथन केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला मेमोरीकार्ड मधील फाईल क्र. 260518_1519 ऐकुण स्क्रिप्ट तयार करण्यात आली हॅश व्हॅल्यु घेतली असता 738DF61F4A5A0D59E311C44D872C3627 अशी निर्माण झाली त्यानंतर मेमोरीकार्ड चे वर्णनाचे लेबल तयार करुन पंचाचे व आमच्या सहिने मेमोरीकार्ड सिलबंद करण्यात आले बाबत सविस्तर नोंद पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेली आहे.

आम्ही दि. 25/05/2026 रोजी आमचे कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रशासकिय इमारत क्र. 1 चौथा माळा सिव्हील लाईन, नागपूर येथे हजर असताना वेळ 11/00 वाजता तक्रारदार श्रीमती शुभला जनबंधु व त्यांचे पती श्री. गौरव जनबंधु हे आमचे कार्यालयात येवुन कळविले की, गैरअर्जदार श्री. हर्षल कसबे, लिपीक राज्य विमा कामगार, सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर यांनी सापळा पडताळणी दरम्यान दि. 18.05.2026 रोजी दोन एक दिवसामध्ये काॅल करतो असे म्हणाले होते परंतु आजपावेतो त्यांचा मला काॅल आलेला नाही व करणार की नाही याबाबत सांगता येणार नाही. परंतु आज रोजी सापळा कार्यवाहीचे आयोजन करुन मला माझे पती श्री. गौरव जनबंधु व पंच मॅडम यांचेसह गै.अ. श्री. हर्शल कसबे हे नक्कीच लाच मागणी करुन लाच रक्कम स्विकारेल असे मला वाटते. तरी सापळा कार्यवाहीचे आयोजन दि. 25/05/2026 रोजी करण्यात यावे अशी विनंती केली. तक्रारदार यांचे विनंतीवरुन आम्ही तात्काळ उपरोक्त दोन्ही षासकिय पंचांना आमचे कार्यालयामध्ये बोलावुन घेतले व स्टाफ हजर करुन घेतला. दोन्ही शासकिय पंच वेळ 11/30 वाजता आमचे कार्यालयात हजर आले. दोन्ही षासकिय पंचांना व स्टाफ यांना तक्रारदार यांनी केलेल्या विनंतीबाबत सांगीतले. पंचांनी तक्रारदार यांना विचारपुस

करुन खात्री करुन घेतली. तक्रारदार यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान गै.अ. श्री. हर्षल कसबे यांनी लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने, तक्रारदार यांना गै.अ. श्री. हर्षल कसबे यांचेकडे लाच रक्कम घेवुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे पती श्री. गौरव जनबंधु यांचे सह पाठवुन सापळा कार्यवाही हनुमान मंदिर, दयानंद ग्राउंड वैशाली नगर नागपूर येथुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व त्यांचे पती यांना हनुमान मंदिर, दयानंद ग्राउंड वैषाली नगर नागपूर येथे हजर होण्यास सांगुन आम्ही सुध्दा तात्काळ आमचे खाजगी वाहन व शासकिय वाहनाने पंच व स्टाफसह रवाना झालो. नमुद ठिकाणी पोहोचुन महिला पंच व महिला स्टाफ समक्ष तक्रारदार यांची अंगझडती घेण्यात आली. तक्रारदार व पंच यांना सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने आवश्यक सुचना देण्यात आल्या स्टाफ यांना आपल्या भुमिकेबाबत समजावुन सांगण्यात आले. त्यानंतर पंच क्र. 2 यांचे हस्ते लाच रक्कम 500 रुपये दराच्या 4 नोटा असे एकुण 2000 रुपये तक्रारदार हिचे हॅंडबॅगच्या पहिल्या कप्प्यामध्ये ठेवण्यात आली व पंच क्र. 2 यांनी आपले हाथ स्वच्छ धुवुन घेतले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये नविन मेमोरी कार्ड क्र. SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 52010NAZN130 BH टाकुण त्यामध्ये कोणताही डेटा नसल्याची पंचांची खात्री करवुन देवुन पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी वेळ 12.21 वाजता व्हाईस रेकाॅर्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांच्या आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत केले व ते व्हाॅईस रेकाॅर्डर एका दोरीचे सहाय्याने तक्रारदार यांचे गळ्यामध्ये शर्टचे आत लटकवुन दिली व त्यानंतर तक्रारदार पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे पती यांना गै.अ. श्री. हर्षल कसबे यांचे कार्यालयात पाठविण्यात आले. त्यांचे मागोमाग आम्ही, पंच क्र. 2 व पो.शि. प्रफुल भातुलकर, गिता चौधरी, होमेश्वर वाईलकर असे आमचे खाजगी वाहनाने तसेच शासकिय वाहनाने चापोशि. राजेंद्र जांभुळकर, पो.हवा. आशिष वैद्य असे गै.अ. यांचे कार्यालय जाण्याकरीता रवाना झालो. आम्ही व आमचे खाजगी वाहनामध्ये असलेले पंच क्र. 2 व स्टाफ असे गैरअर्जदार यांचे कार्यालयाचे आवारात जावुन कोणालाही संशय येणार नाही करीता आम्ही आमचे वाहनामध्येच थांबुन राहीलो. गैरअर्जदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा वेळ 12.36 वा. नियोजित इषारा म्हणुन आम्हास तक्रारदार यांचे पती श्री. गौरव जनबंधु यांनी त्यांचे व्हाॅट्सअॅप क्र. 9168527223 वरुन आमचे व्हाॅट्सअॅप क्रमांकवर le liya hai असा आमचे मोबाईलवर व्हाॅट्सअॅप मॅसेज मिळताच आम्ही पंच क्र. 2 व स्टाफसह तात्काळ ट्रॅप बॅग व इतर साहित्यासह गैरअर्जदार यांचे कॅबिनकडे निघालो व इतर सापळा पार्टीला फोनद्वारे गैरअर्जदार यांचे कॅबिनकडे बोलावुन घेतले. आम्ही पंच क्र. 2 व स्टाफ असे गै.अ. श्री. हर्षल कसबे यांचे कॅबिनकडे जात असतानाच एक इसम त्यांचे कॅबिनमधुन बाहेर येताना दिसला तेथेच पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे पती श्री. गौरव जनबंधु यांनी तोच इसम गैरर्जदार असल्याचा इशारा केला. आम्हाला इषारा समजताच आम्ही स्टाफसह गैरअर्जदार यांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे कॅबिनमध्ये घेवुन गेलो. त्यांना स्वतःबाबत माहिती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव हर्षल अरुण कसबे वय 37 वर्श पद- कनिष्ठ लिपीक, राज्य विमा कामगार, सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर रा.पी 2/14 काकडे पार्क, तालेरा हाॅस्पिटल जवळ, केशव नगर चिंचवड, पुणे ह.मु. सि/ओ. नरेंद्र पांडे, प्लाॅट क्र. 19, वैशाली नगर नागपूर असे सांगीतले. काही वेळातच सापळा पथक कार्यालयात हजर आले. गैरअर्जदार यांना पंच व सापळा पथक यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांचेकडील व्हाॅईसरेकाॅर्डर पंच क्र. 1 यांचे आवाजात आमचे सुचनेवरुन पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी वेळ 12/44 वा. बंद केला.

त्यानंतर सापळा कार्यवाहीबाबत प्रात्यक्षिक प्रमाणे गैरअर्जदार यांनी लाच स्विकारल्याबाबत अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्रा व्हायलेट लॅम्पच्या सहाय्याने पाहणी करणेकरीता आमचे सुचनेवरुन पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी पंचासमक्ष एक नविन मेमोरीकार्ड क्र. SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 52010NAZN130 BH त्यांचे विवो कंपनीचे स्माटफोनमध्ये टाकुन लोकेशन एस.डी.कार्ड अशी मोबाईलमध्ये सेटींग करुन कार्यवाहीकरीता व्हिडीओ रेकाॅर्डीग सुरु केली व त्यानतर आम्ही पंच क्र. 1 यांना लाच रक्कम कोणी स्विकारली आणि कुठे ठेवली याबाबत विचारले असता, त्यांनी सांगितले की, ''तक्रारदार यांनी त्यांचे हॅंडबॅगच्या पहिल्या कप्प्यातुन लाचरक्कम आपले उजवे हाताने काढुन गैरअर्जदारांना दिले गैरअर्जदार यांनी लाचरक्कम आपले डावे हाताने घेवुन आपले फुलपॅन्टच्या मागच्या डाव्या खिशामध्ये ठवले आहे.'' असे सांगीतले त्यानंतर आम्ही सापळा रक्कम गैरअर्जदार यांचे ताब्यातुन पंच क्र. 2 यांचे हस्ते ताब्यात घेण्याचे पुर्वी आम्ही गैरअर्जदार यांना अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हाईलेट लॅम्पचे गुणधर्माबाबत समजावुन सांगीतले. त्यानंतर आमचे दोन्ही पंच व सापळा पथकातील हजर असलेले सर्व सदस्यांचे कक्षमध्ये अंधार करून अल्ट्राव्हाईलेट लॅम्पचे प्रकाशात हात तपासले असता कोणाचेही हातावर हिरवटसर रंगाची चकाकी दिसुन आली नसल्याची गैरअर्जदार यांना खात्री करून दिली. त्यानंतर सदरची लाच रक्कम आमचे सुचनेवरुन पंच क्र 2 यांनी गैरअर्जदार श्री. हर्षल कसबे यांचे फुलपॅंटच्या मागच्या डावे खिशातुन काढुन घेतली.

त्यानंतर गैरअर्जदार श्री. हर्शल कसबे यांचेकडून लाच रक्कम ताब्यात घेतल्यानंतर कार्यालयात अंधार करुन पंच क्र. 2 यांचे दोन्ही हात अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासल्या असता पंच क्र. 2 यांचे उजव्या हातावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.त्यानंतर लाचेच्या नोटा अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासल्या असता सदर नोटांवर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आल्याचे दोन्ही पंचाचे व आमचे निदर्शनास आले. तसेच गैरअर्जदार श्री. हर्षल कसबे यांचे उजव्या व डाव्या हाताची बोटे अल्ट्राव्हॅायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासली असता त्यांच्या डावे हातांच्या बोटांवर व तळ हातावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर गैरअर्जदार यांनी परिधान केलेला फुल पॅन्टच्या मागील डाव्या खिषाची अल्ट्राव्हॅायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता त्यावर हिरवट चकाकी दिसुन आली.

तक्रारदाराचे हात व त्यांचा त्यांच्या बॅगच्या पहिल्या कप्प्याची अंधारामध्ये अल्ट्राव्हॅायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता त्यावर हिरवट चकाकी दिसुन आली. यानंतर आरोपीची अंगझडती घेवुन त्याची यादी तयार करण्यात आली व त्यावर श्री. हर्षल कसबे यांची स्वाक्षरी केलेली आहे. गैरअर्जदार यांचा मोबाईल तपासनी कामी ताब्यात घेवुन स्वतंत्र जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आलेला आहेत. तसेच गैरअर्जदार यांना पर्यायी पॅंटची व्यवस्था करुन लाचरक्कम ठेवलेला त्यांचा फुलपॅंट ताब्यात घेवुन जप्त करण्यात आला आहे. त्यांचे कार्यालयातील casio कंपनीचा कॅल्क्युलेटर, तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांचेकडे सादर कलेले कागदपत्रे, गैरअर्जदार यांचेकडुन ताब्यात घेवुन जप्त करण्यात आलेले आहेत. लाचरक्कम, मोबाईल, कॅल्क्युलेटर व लाचरक्कम ठेवलेला गैरअर्जदाराचा फुलपॅन्ट स्वतंत्र जप्तीपत्रकाप्रमाणे कागदी लिपाफ्यामध्ये ठेवुन गैरअर्जदार, पंच व आमचे स्वाक्षरीचे कागदी लेबल तयार करुन सिलबंद करण्यात आले. अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पने ़ गैरअर्जदार यांचे हाथ, फुलपॅन्ट तक्रारदाराचे हाथ, हॅन्डबॅग, पंच क्र. 2 यांचे हाथाची पाहणी झाल्यानंतर आमच्या सुचनेवरुन पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी व्हिडीओ रेका ॅर्डींग बंद केली मोबाईलमधुन मेमोरीकार्ड काढुन ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर तक्रारदाराची सापळया नंतरची अंगझडती महिला पंच व महिला स्टाफ समक्ष घेतली असता त्यांचे जवळ सापळयापुर्वीच्या अंगझडती घेण्यात आली. घटणास्थळाचे ठिकाणांचे मोजमाप टेपच्या सहयाने घेवुन त्याची नोंद घेण्यात आली. त्याच प्रमाणे घटनास्थळाचा कच्चा नकाशा म.पो.हवा. गीता चौधरी यांचे हस्ते तयार करण्यात आला.

त्यानंतर पंच क्र 2 यांना गैरअर्जदार श्री. हर्षल कसबे यांनी तक्रारदार यांचे कडुन स्विकारलेली लाच रक्कम 2,000 रू ज्यात 500 रू दराचे चलनी 4 नोटा गैरअर्जदार यांचे कार्यालयातच नोटाचे क्रमांक आमचे सुचनेवरून पंच क्र. 1 श्रीमती श्रुतिका ठवरे यांनी वाचले व पंच क्र. 2 खुशाल खोब्रागडे यांनी प्रात्यक्षीक पंचनामा मधील नमुद नोटाच्या क्रमांकाशी जुळवुन पाहीले व बरोबर असल्याची खात्री करुन घेतली.

सदर नोटा एका लिफाप्यात ठेवून नोटांच्या विवरणाचे कागदी लेबल व जप्तीपत्रक शासकिय लॅपटापवर तयार केले. नोटांचे विवरण लिहिलेले लेबल व जप्तीपत्रकाची प्रिंट गैरअर्जदार यांचे कार्यालयाचा विद्युत पुरवठा वापरून सदर नोटांचे विवरण असलेले लेबलची प्रिंट शासकिय प्रिंटरचे सहाय्याने काढुन, त्यावर आमची, गैरअर्जदार श्री. हर्षल कसबे, तसेच दोन्ही पंचांची सही घेवून कागदी लेबल लिफाप्यावर चिटकवून लिफापा सिलबंद करण्यात आला. सदर लिफाफा ट्रॅपबॅगमध्ये सुरक्षित ठेवण्यात आला.

यानंतर आम्ही, पंच क्र. 1 श्रीमती श्रुतिका ठवरे यांना तक्रारदार श्रीमती शुभला जनबंधु व गै.अ.श्री. हर्षल कसबे यांच्यात सापळा कार्यवाही दरम्यान झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, मी तक्रारदारासोबत त्यांच्या मोपेड वाहनाने गै. अ. श्री. हर्षल कसबे यांचे कार्यालयामध्ये तेव्हा सोबत तक्रारदार यांचे पती श्री. गौरव हे सुध्दा सोबत होते. नमुद गैरअर्जदार यांचे लाच सापळा कार्यवाही करीता गेलो तेथे पोहाचेल्यावर मी, तक्रारदार व त्यांचे पती श्री. गौरव असे गैरअर्जदार यांचे कक्षाकडे गेलो होतो. कक्षामध्ये गै.अ. श्री. हर्षल कसबे हे हजर होते. आम्ही तिघेही त्यांचे कार्यालयामध्ये जात असताना मला गै.अ. यांनी बाहेर थांबण्यास इशारा केला. मी कक्षाबाहेरच उभे राहुण तक्रारदार, त्यांचे पती व गैरअर्जदार श्री. हर्षल कसबे यांचे संभाशण बारकाईने ऐकत होते. कक्षातील टेबल व माझे अंतर जवळच असल्याने मला स्पष्ट ऐकु येत होते व कक्षातील सर्व घडामोडी मला सहज दिसत होत्या. सर्वप्रथम तक्रारदार ही गैरअर्जदार यांचेशी आपले वैद्यकीय बिलाबाबत बोलली व वैद्यकीय बिलाचे पैसे कधीपर्यंत जमा होतील याबाबत विचारणा केली यावर गैरअर्जदार यांनी तिनक महिने लागतील असे सांगितले, त्यानंतर तक्रारदार यांचे पती श्री. गौरव जनबंधु याने लहान बाळ असल्याने वारंवार येणे होत नाही असे गैरअर्जदार यांना सांगीतल्याने गैरअर्जदार यांनी बर द्या मग देवुन द्या असे म्हटल्यावर तक्रारदार हीने आपले हॅंडबॅग च्या पहिल्या कप्प्यातुन उजवे हाताने लाचरक्कम काढुन गैरअर्जदार यांना दिले. गैरअर्जदार यांनी किती आहेत अषी तक्रारदारास विचारणा केली त्यावर तक्रारदार हीने दोन हजार असे सांगीतले, गैरअर्जदार याने बाकी मग कधी देणार अशी विचारणा केली त्यावर तक्रारदार हिचा पती याने आपण बोलाल तर आनलाईन करुन देतो असे म्हटल्याने

गैरअर्जदार याने ठिक आहे असे बोलले. गैरअर्जदाराने लाचरक्कम आपले डावे हाताने स्विकारुन परिधान केलेल्या फुलपँटच्या मागील डाव्या खिषामध्ये ठेवले त्यानंतर तक्रारदार व त्यांचे पती हे गैरअर्जदाराचे कक्षाच्या बाहेर आले व त्यानंतर गैरअर्जदार हे सुध्दा कक्षाच्या बाहेर आलेत दरम्यान आपण स्टाफ व पंच क्र. 2 सह येवुन गैरअर्जदार यांना ताब्यात घेवुन पुढील कार्यवाही केली. व काही वेळाने माझे आवाजात व्हाॅईस रेकाॅर्डर बंद केला आहे असे कथन केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. त्यांनतर व्हाॅईस रेकाॅर्डर व्दारे तक्रारदार व गैरअर्जदार श्री. हर्षल कसबे यांचे सापळा कार्यवाही दरम्यान झालेले संभाषण शांत वातावरणात ऐकुन त्याचे शब्दश: टिपण करणे असल्याने, तसेच गैरअर्जदार यांचे कार्यालयात गर्दी व गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याने पुढील कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय प्रषासकिय इमारत क्र. 1 चौथा माळा सिव्हील लाईन नागपूर येथे करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. तसेच लाच रक्कम आरोपी श्री हर्षल कसबे यांनी स्विकारली असल्याने, आरोपीस आमचे खाजगी वाहनात बसवुन, सापळा पार्टीतील सदस्य, तक्रारदार, त्यांचे पती व पंचासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय प्रशासकिय इमारत क्र. 1 चौथा माळा सिव्हील लाईन नागपूर येथे पुढील कार्यवाहीकरीता घेवुन आलो.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय प्रशासकिय इमारत क्र. 1 चौथा माळा सिव्हील लाईन नागपूर येथे पोाहचल्या नंतर आरोपीस तक्रारदाराकडून लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारल्याबाबत त्यांचे काय म्हणणे आहे?. याबाबत लेखी निवेदन घेण्यात आले. त्यानंतर सदर व्हाईस रेकाॅर्डर मधील **SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 52010NAZN130 BH** मधील 260525_1221 या फाईल चे **SEVENZA Hash Calculator** या अप्लीकेशन साॅफ्टवेअरच्या **MD5 Algorithm** साह्याने हॅश व्हॅल्यु पडताळणी नंतर काढली असता हॅश व्हॅल्यु **C4C164E3FE63776959E8EDB37CE6D02B** अशी निर्माण झाली आहे. मेमोरी कार्डच्या वर्णनाचे लेबल तयार करुन मेमोरी कार्ड सिलबंद करण्यात आले. बाबत सविस्तर नोंद सापळा कार्यवाही पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आलेली आहे.

तरी यातील गैरअर्जदार हर्षल अरुण कसबे वय 37 वर्ष पद- कनिष्ठ लिपीक, राज्य विमा कामगार, सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर रा.पी 2/14 काकडे पार्क, तालेरा हाॅस्पिटल जवळ, केशव नगर चिंचवड, पुणे ह.मु. सि/ओ. नरेंद्र पांडे, प्लाॅट क्र. 19, वैशाली नगर नागपूर याने तक्रारदार यांचे प्रसुतीचे वैद्यकीय बिल पास करुन देण्याच्या मोबदल्यात दि. 18/05/2026 रोजी स्वतःचे लाभाकरीता लाचमागणी करुन दि. 25/05/2026 रोजी स्वत: लाच स्विकारल्याने त्यांचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, सुधारणा 2018 कलम 7 अन्वये कायदेशीर कार्यवाही होणेकरीता माझी कायदेशीर फिर्याद आहे.

(जितेंद्र वैरागडे)

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत

प्रतिबंधक विभाग नागपूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Aniruddha Ramesh Puri (I (Inspector)) / DGPARPM7605SS **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Aniruddha Ramesh
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPARPM7605SS

26/5/26

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

26/05/26

DUTY OFFICER
Police Station
Panchpoli, Nagpur

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**